## पोलीस आयुक्तालय अमरावती शहर

## दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०४/०२/२०२३

### ➢ खुनाचा प्रयत्न

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र १६५/२०२३ कलम ३०७,३४ भादवी सहकलम ३/२५, ४/२५ आर्म ॲक्ट | नवसारी जवळ बापुच्या हॉटेल जवळ अमरावती | घता वेळ दि ०३.०२.२०२३ चे १०.३० वा<br><br>दाखल ता वेळ - ०३.०२.२०२३ चे १९.०३ वा | मोहम्मद इम्रान मोहम्मद जमील वय ३६ वर्ष नुर नगर नं.२ अंजुमन शाळेच्या मागे अमरावती | १ शोयब , २. मुज्जीप (लंबे बाल वाला )अधिक दोन अनोळखी इसम रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठीकानी नमुद फिर्यादी हे नवसारी जवळ बापू हॉटेल जवळ उभे होते. तेव्हा तिथे आरोपी हे कार मध्ये आले व कार फी समोर उभी करुन कारमधून आरोपी क्र १ याने बंदुक काढून फीचे समोर दाखवून म्हणाला की, गोली चला दुंगा असे बोलून बंदुक कारमध्ये ठेवली आणि कारमधून चाकू काढून फीचे मागून वार केले तसेच मुज्जीप आणि दोन अनोळखी इसम यांनी लाथा बुक्यांनी मारुन जखमी करुन शोयब आणि त्याचे साथीदारांनी जिवे मारण्याचे उद्रदेशाने हमला करुन फीचे मागून तिन चार वेळा वार केला. अशा फी चे जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल. |

## ➢ दुखापत

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे गाडगे नगर अमरावती अपक्र १६२/२०२३ कलम ३२४,३४ भादवी | मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर अमरावती | घता वेळ दि ०२.०२.२०२३ चे संध्या. १९.०० वा<br><br>दाखल ता वेळ ०३.०२.२०२३ चे ०१.२४ वा | एक महीला | १. पवन जितू सोमकुवर वय २२ वर्ष , २. सागर जितू सोमकुवर रा कपीलवस्तू नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता.वेळी व ठीकानी नमुद फिर्यादी घरी हजर असतांना आरोपी क्र १ याने फीस विनाकारण बोलला असता फी ने त्यास म्हटले की, तुम्ही कामाला जा घरी बसून काय करता तर आरोपीपे फी सोबत वाद केला शिवीगाळ केली व बुक्यांनी तोंडावर व डोक्यावर उजव्या डाव्या हातावर मारहाण केली त्यामुळे ओठाला लागले तसेच आरोपी क्र २ याने सुध्दा फीस थापडांनी मारहाण केली. अशा फी चे जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल. |

## ➢ गैरकायदयाची मंडळी जमविणे

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता ० | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | भातकुली 27/2023 कलम 143,147,324,294,506भादवी . | फिर्यादीचे घरासमोर सरकारी जागा ग्राम नांदेडाखुर्दता भातकुली | घ.ता.वेळी<br><br>दि.27.01.23 रोजीचे 18.00 वा ते 19.30 वा<br>दा.ता.वेळ दि.03.02.23 रोजीचे 16.51 वा<br>पो.स्टे.ला माहीती दि.03.02.23 रोजीचे15.30वा. | **एक महीला** | 1) श्रीराम कळसकर वय 60 वर्ष रा. नांदेडा खुर्द 2)विजय कळसकर वय 32 वर्ष रा. नांदेडाखुर्द 3) **एक महीला** 4) **एक महीला** 5) सोपान जुवार वय 40 वर्ष रा. विर्शी 6) निलेश ठाकरे वय 38 वर्ष रा. आष्टी 7) **एक महीला** | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावात एकमेकांचे शेजारी राहत असुन आरोपी व फिर्यादी यांचे घरासमोरील खुल्या दागेवरुन बरेच दिवसापासुन त्यांच्यात वाद सुरु होता सदर खुल्या जागे वरुन फिर्यादीचा येण्याजाण्याचा रस्ता असुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन खुल्या जागेवर त्यांनी गेट बसविण्याचे काम चालु केले असता फिर्यादीचे पतीने त्यांना सदर जागेवर कशाला बांधकाम करत आहे असे समजविण्यास गेले असता त्यांनी शिवीगाळ करुन तुज्या कडुन जे होते ते करुन घे अशी धमकी दिली. फिर्यादीचे पती काही वेळात बाहेर गावी गेल्यावर आरोपीतांनी परत गेटचे काम सुरु केले त्यावेळेस फिर्यादी त्यांना समजाविण्यास गेले असता आरोपी क्र 2 विजय कळसकर यांने फिर्यादी ओढताढ करुन अश्लिल शिवीगाळ केली व गड्ड्या मध्ये असलेला लोखंडी पाँईप फिर्यादीचे डाव्या पायावर मारुन जख्मी केले अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व मेडी. सर्टी वरुन वरुन सदरचा गुन्हा दाखल . |

## ➢ वाहन चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे फ्रेजरपुरा १०६ /२३कलम ३७९ भादवी | राहुलनगर बिच्छुटेकडी अमरावती | दि ०२.०२.२३चे रात्री १०.००वा ते दि ०३.२.२३चे ०३.००वा दरम्यान | एक महीला | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी त्ाची गाडदि ०२.०३.२३चे रात्री २२.०० वा दरम्यान घरासमोर लावुन आत गेले व दि ०३.०२.२३रोजी सकाळी ३.०० वा दरम्यान ग्रामीण पोलीस भरती अमरावती येथे जात असतंना त्यांना त्याची गाडी अँक्टीव्हा क्र एम एच २७ सी क्यु ८८७१कि २०,०००हि तेथे दिसुन न आल्याने त्यंनी आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली असे फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |
| २. | पोस्टे राजापेठ अप क्र. १२३/२३ कलम ३७९ भादंवि | गोपाल नगर अमरावती | दि. ३१/०१/२३ चे ०४-०७ वा<br><br>दि. ०३/०२/२०२३ चे १५-२७ वा | एक महीला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने तिच्या मुलीची लेडीज सायकल PARROD कंपनीची कि.अं. ३००० रू. ची रात्री दरम्यान घराच्या अंगणात उभी करून ठेवली असता फिर्यादीच्या मुलीची नमुद वर्णनाची सायकल हि कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली .अशा फि. चे जबाणी रि. वरून सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा अपक्र १०५/२३ कलम ३७९ भादवी | आठवडी बाजार पुरा | दि ०३.०२.२३चे १८.५०वा<br>दि ०३.०२.२३ चे २२.०६वा | संदीप अर्जुन शिरसाट वय ४३वर्ष व्यवसाय नोकरी रा पोटे टाउनशीप प्लॉंट ने ७७२ अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी हे आठवडी बाजार चपराशीपुरा येथे बाजार आणण्याकरीता गेले असता घटना तावेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे खिशातुन विवो वाय २१ कंपनीचा मोबाईल किं १४०००रू चा चोरून नेला असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | नांदगाव पेट अप नं ५२/२३ कलम ३७९ भादवी | लोटस ईन मँरेज हाँल रिंग रोड रहाटगाव अमरावती | घ.ता.वेळ ३-२-२३ चे ११/०० वा दरम्यान<br>दि. ३/०२/२०२३ चे १३/०० वा<br>दा.ता.वेळ ३-२-२३ चे १४-०६ वा | श्रीकांत माधवराव वानखडे वय ५६ वर्ष रा समर्थ काँलनी रुक्मीनी नगर अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची भाची ऐश्वर्या हिचा विवाह दि. २९/०१/२३ रोजी लोटस ईन मँरेज हाँल रहाटगाव रिंग रोड अमरावती येथे संपन्न झाला. तिला खाऊच्या स्वरुपात नातेवाईकांनी पैशाचे पाँकीट दिले होते. ते पाँकीट तिने पर्समध्ये खुर्चीच्या बाजुला ठेवले होते. ती पर्स दिसुन न आल्याने त्याबाबत नातेवाईकाकडे चौकशी केली असता ती पर्स मिळुन आली नाही. त्या पर्समध्ये नातेवाईकांनी खाऊ स्वरुपात दिलेले अंदाजे नगदी ३०,००० रु होते. ती पर्स कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अशा फि च्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ पळवुण नेणे

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टै गाडगेनगर अप क्र १६०/२०२३ लम ३६३ भादवि | विलास नगर गल्ली नं ६ अमरावती | दि.०२.०२.२०२३ चे १२.३० वा<br>दातावेळ ०३.०२.२०२३ चे ००.४८ वा | एक महीला | अज्ञात | हककीत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना ता.वेळी व ठीकाणी यातील फीर्यादी महिलेचा मुलगा आज दि. ०२.०२.२०२३ रोजी १२.३० वा घरुन कोणालाही न सांगता निघुन गेला त्याच्या अंगामध्ये हिरव्या कलरचा लांब बाहीची टी शर्ट व जिन्स पॅन्ट निळया कलरची व पाया मध्ये शुज ब्लु पांढरा असे कपडे घातलेले अशुन उंची ५ फुट रंग गोरा बांधआ सडपातळ मानेवर तीळ उजव्या बाजुला असुन खांद्यावर निळया कलरची कॉलेज बॅग त्यामध्ये तीन ड्रेस कपडे व आधार कार्ड मोबाईल ९६९९८३५४१२ घेवुन गेला आहे त्याचे घरी निघुन जाणेबाबत पो स्टे ला रिपोर्ट आहे त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने पळुन नेले असावे.वरुन अशा फीर्यादीचे लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ विश्वासघात (फसवणुक)

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टे गाडगेनगर अप क्र १६१/२०२३ लम ४२० भादव ६६(क) आय टी ॲक्ट | वृंदावन कॉलनी अमरावती | २०.१२.२०२२चे १२.०८ वा दातावेळ ०३.०२.२०२३ चे ०१.०० वा | राजेश बळीराम सलामे वय ६२ वर्ष व्यवसाय सेवानिवृत्त रा. वृंदावन कॉलनी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागे अमरावती | ८२५०४४७८८५ चा मोबाईल धारक | हककीत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना तावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी राजेश बळीराम सलामे हे त्यांचे घरी हजर असता दि २०.०१.२०२२ चे दुपारी १२.०८ ला मो नं. ९८२२६५२६२३ यावर मोबाईल नं. ८२५०४४७८८५ यावरुन फोन आला व फी ला म्हटले की आम्ही स्टेट बँक ऑफ इंडीया च्या क्रेडीट कार्ड आले आहे. तुम्ही ॲक्टीव्ह केले नाही कस्टमर केअर ऑफीस मधून बोलत आहे. तुम्ही दोन महीन्यापुर्वी क्रेडीट कार्ड आले आहे तुम्ही ॲक्टीव्ह केले नाही. तुम्हाला पेनॉल्टी बसणार असे म्हणून मी त्यांना क्रेडीट कार्ड बंद करण्याबददल सांगितले तेव्ही फीला क्रेडीट कार्डवर समोरच्या बाजूला असलेल्या १६ अंकी नंबर विचारला व फी ने १६ अंकी नंबर सांगितला त्यानंतर दि. २४.०१.२०२३ रोजी फी चे मोबाईलवर इमेल चेक केले तेव्हा फी च्या मोबाईलवर लिंक असलेल्या क्रेडीट कार्ड वरुन जंगली गेम इंडीया पी ३५६ यावर २५,०००/-रु चे एकूण ट्रान्झश न असे एकुण १,००,०००/- रुपयाचे ट्राक्झश्न झालेले दिसले जे फीने केलेले नव्हते त्यामुळे दि. २५.०१.२०२३ रोजी स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कॅम्प शाखेत जावून स्टॉफ ला ट्रान्झाक्श्न बददल माहीती दिली. तेव्हा जंगली गेम इंडीया पी ३५६ यावर २५०००/- रुपये चे एकुण ४ ट्रान्झकशन झाल्याचे सांगितले वरुन क्रेडीट कार्ड ब्लॉक केले व मोबाईल नं चेंज केला तसेच दि २७.०१.२०२३ रोजी बियाणी चौक येथे जावून क्रेडीट कार्ड चेक तेव्हा २५,०००/- रु चे ४ ट्रान्झाक्श्न झाल्याचे दिसले यावनु फीर्यादीचे १,००,०००/- रुपयाची फसवणूक केली वरुन अशा फीर्यादीचे लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पो स्टे गाडगेनगर अप क्र १६४/२०२३ कलम ४२० भादव ६६(क) आय टी ॲक्ट | पलाश लाईन गाडगे नगर अमरावती | ०६.१०.२०२३चे १६.०० वा<br>दातावेळ ०३.०२.२०२३ चे १३.३४ वा | एक महीला | ८७५०८०८२६०,९५९९३५७९१२ चा मोबाईल धारक | हक्कीत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील फीर्यादी यांचे स्टेट बँक ऑफ इंडीया शाख तेल्हारा जि अकोला येथे खाते क्र ३७६८५५२३९३७ असून क्रेडीट कार्ड क्र ६५२१७७०००२४४५९७६ असून मो क्र ९५२७७४८६७१ संलग्न आहे त्यांचा एटीएम/क्रेडीट कार्ड चा नियमीत वापर करीत असून ते नेहमी गुगल पे असेच ऑनलाईन बँकींगचे व्यवहार व फोन पे चे व्यवहार नियमीत करीत असून त्यांना दि. ०६.१०.२०२२ ला १६.०० वा त्यांना ८७५०८०८२६०, ९५९९३५७९१२ या मोबाईल क्रमांकावरुन फोन आला व ऑन- लाईन नोकरीसाठी हा फोन आहे असे फोन धारक म्हणाले तेव्हा फीर्यादी यांनी त्यांना मनाई केल्यावरुन सदर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | फोन धारक यांनी त्यांना तुम्ही ७ वर्षापर्यंत कुठेही नोकरी करु शकणार नाही व तुमच्या विरुध्द कोर्टात केस घेणार आणि त्यासठी तुम्हाला ५०००/- रुपये दयावे लागणार तयावरुन फीर्यादी घाबरले व त्यांना परत फोन केला तेव्हा त्यांनी सांगितले की, ४८०० /- रुपये फोन पे द्वारे पाठवा तर कोर्टात केस होणार नाही. फीर्यादी यांनी सदर मोबाईल क्रमांकावर ४८००/- , २१००/- व १९३२ रुपये त्यांना पोन पे करुन दिले व नंतर त्यांचे लक्षात आले की आपली फसवणूक होत आहे. अशा फीर्यादीचे लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## अपघात:-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | जखमीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० |
| १ | बडनेरा अप.नं. १०६/२३ कलम २७९, ३३७ भा.दं.वि. | नेमाणी गोडाऊन जवळील हरिओम मंगलम कार्यालय समोर, बडनेरा रोड, अमरावती | घटना ता. वेळ दि.०३.०२.२३ चे ११.०० वा.<br>माहीती वेळ - दि ०३.०२.२३ चे ११.१५ वा<br>दाखल ता. वेळ - दि. ०३.०२.२३ चे १३.४३ वा. | आनंद अरूण चौधरी, वय ३४ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा. पंचवटी कॉंलनी, व्ही.एम.व्ही. रोड अमरावती. | पांढ-या रंगाची झायलो कार क्र. MH१४-CX-६७५० चा चालक. | 1)शिवानंद युवराजसिंग चौधरी, वय २२ वर्षे, रा. मांगीलाल प्लॉंट, अम.<br>२) धिरज कमलाकर ठाकरे, वय ३३ वर्षे, रा. सबनीस प्लॉंट,्अम. | हकीक्त अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीचा पुतण्या शिवानंद युवराजसिंग चौधरी, वय २२ वर्षे, रा. मांगीलाल प्लॉंट, अम. आणि धिरज कमलाकर ठाकरे, वय ३३ वर्षे, रा. सबनीस प्लॉंट,्अम. असे त्यांची सुझुकी मोपेड दुचाकी गाडी क्र. MH-२७-DK-१९१९ ने घरी येण्यास निघाले असता मागुन येणा-या पांढ-या रंगाची झायलो कार क्र. MH१४-CX-६७५० चा चालकाने त्याच्या ताब्यातल वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मागुन ठोस मारून अपघात केला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून व मेडीकल सर्टी .वरून सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पो स्टे गाडगे नगर अमरावती अपक्र.१६३/२३कलम-२७९,३३७ भादवि | पंजाबराव कृषी फार्म समोर वेलकल टी पॉइंट अमरावती | घटना तावेळ दि. ०२/०२/२३ चे २२.४५ वा<br>दाखल तावेळ दि.०३/२/२३ चे ०७.४२ वा | दिपराज विश्वंभर यादव वय २६ वर्ष व्यवसाय चायनीज गाडी रा. सबनिस प्लॉट अमरावती | ट्रक क्रमांक एच आर ७४ ए ५८२९ चा चालक | -- | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकानी यातील फिर्यादी यांनी जबानी रिपोर्ट दिला की, वरील पत्यावर आई वडीलांसोबत राहतो व चायनीज हातगाडी चालवितो त्याचे घरासमोर अभिषेक विजय उपाध्याय वय ३२ वर्ष हे राहतात व पापड विक्री काम करता गुन्हयातील घतावेळ व ठीकाणी अभिषेक उपाध्याय हे त्यांची हीरो होंडा स्प्लेंडर गाडी क्र एम एच ३१ बी झेड १०९९ ने वेलकम टी पॉइंट चौक कडे जात असता पंजाबराव कृषी फार्म सोबत पाठीमागून येणारा ट्रक क्र एच आर ७४ ए ५८२९ च्या चालकाने ठोस मारुन अपघात केला अपघातामध्ये अभिषेक उपाध्याय यांच्या डोक्याला , खांदयाला व पाठीला मार लागला सध्या अभिषेक उपाध्याय यांचा उपचार रेडीएन्ट दवाखाना अमरावती येथे उपचार सुरु आहे. ट्रक क्र एच आर ७४ ए ५८२९ च्या चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून अभिषेक उपाध्याय याच्या बाईकला ठोस मारुन अपघात केला. अशा फिर्यादीच्या जबानी रि. वरुन |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | सदर चा गुन्हा दाखल. |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्र. १२२/२०२३ कलम २७९ भादंवि | रविनगर चौक अमरावती | दि. ०१/०२/२०२३ चे १६-०० वा. दरम्यान<br><br>दि. ०३/०२/२०२३ चे ००-२२ वा. | पांडुरंग नानाजी तायडे वय ५९ वर्ष धंदा सेवानिवृत्त रा. रविनगर संकट मोचन हनुमान मंदिराजवळ अमरावती | वाहन क्र MH २७ AB ९५२३ काळ्या रंगाची गाडीचा चालक विक्की दयारात मुंडे रा. फुल आमला ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती | ----- | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फि. अशा फि. हा दि. ०१/०२/२०२३ चे १६-०० वा. त्याची मारूती स्विफ्ट डिझायर पांढ-या रंगाची गाडी क्र. MH १६ AX ८३०० चारचाकी गाडीने रविनगर चौक येथुन समर्थ हायस्कुल चौकाकडे वळन घेत असतांना एक मोटर सायकल क्र. MH २७ AB ९५२३ काळ्या रंगाची ट्रिपल सीट गाडीवर बसुन त्याची गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाणे चालवुन मागून येवुन फिर्यादीच्या समोरील डाव्या बाजुच्या चक्काजवळ धडक दिली. त्यामुळे फिर्यादीचे गाडीचे समोरील डाव्या बाजुच्या चक्काजवळील पॅनल चपकले व त्यामुळे फिर्यादीचे दहा हजार रूपयाचे नुकसान झाले. सदर चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव विक्की दयारात मुंडे रा. फुल आमला ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती असे सांगीतले . फिर्यादी बाहेरगावी कामानिमित्य जात असल्याने आज रोजी पो.स्टे. ला येवुन रिपोर्ट दिला. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ ईतर

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा, अप.नं. १०७/२३ कलम १३५ भा.विद्युत का. | लालखडी अमरावती. | घटना ता. वेळ - १७.०९.२२ चे १४.०० वा.<br>माहीती वेळ - दि. ०३.०२.२३ चे १४.३० वा<br>दाखल ता. वेळ - दि. ०३.०२.२०२३ चे १५.०१ वा. | अंकुश बाबाराव पेटले, वय ३२ वर्षे, धंदा- नोकरी, सहायक अभियंता, महावितरण, अमरावती शहर उपविभाग -२. | एक महीला | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या स्टाफसह वीज चोरी पकडणे मोहीम राबवित असतांना आरोपीने त्याच्या मिटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून वीज मिटर मंदगतीने चालवुन महावितरण चे २६४३ वीज युनीट कि . अं. ४३६९० रू. ची चोरी केल्याचे आढळुन आले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | बडनेरा, अप.नं. १०८/२३ कलम १३५ भा.विद्युत का. | लालखडी अमरावती. | घटना ता. वेळ - १७.०९.२२ चे १४.०० वा.<br>माहीती वेळ - दि. ०३.०२.२३ चे १४.३० वा<br>दाखल ता. वेळ - दि. ०३.०२.२०२३ चे १५.०१ वा. | अंकुश बाबाराव पेटले, वय ३२ वर्षे, धंदा- नोकरी, सहायक अभियंता, महावितरण, अमरावती शहर | एक महीला | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या स्टाफसह वीज चोरी पकडणे मोहीम राबवित असतांना आरोपीने त्याच्या मिटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून वीज मिटर मंदगतीने चालवुन महावितरण चे ३२८७ वीज युनीट कि . अं. ५२८१० रू. ची चोरी केल्याचे आढळुन आले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उपविभाग -२. | | |
| ३ | बडनेरा,<br>अप.नं. १०९/२३<br>कलम १३५<br>भा.विद्युत का. | लालखडी<br>अमरावती. | घटना ता. वेळ - १७.०९.२२ चे १५.०० वा.<br>माहीती वेळ - दि. ०३.०२.२३ चे १४.३० वा<br>दाखल ता. वेळ - दि. ०३.०२.२०२३ चे १५.३० वा. | अंकुश बाबाराव पेटले, वय ३२ वर्षे, धंदा- नोकरी, सहायक अभियंता, महावितरण, अमरावती शहर उपविभाग -२. | अब्दुल शारिक अब्दुल सादिक, वय ५७ वर्षे, रा. लालखडी, अमरावती. | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या स्टाफसह वीज चोरी पकडणे मोहीम राबवित असतांना आरोपीने त्याच्या मिटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून वीज मिटर मंदगतीने चालवुन महावितरण चे ३३७३ वीज युनीट कि . अं. ६१४४० रू. ची चोरी केल्याचे आढळुन आले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल. |
| ४ | पोस्टे राजापेठ<br>अप क्र. १२५/२०२३<br>कलम २९४, ५०४, ५०६ ब, ३५२, ३४<br>भादंवि | नंदा मार्केट दंडे प्लॉट राजापेठ अम. | दि. ०३/०२/२०२३ चे १६-४०वा. दरम्यान<br><br>दा.ता. वेळ दि. ०३/०२/२०२३ चे २०.४२ वा. | एक महीला | अनोळखी ३ मुले वय अंदाजे २१ ते ३० वर्ष | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी दि ३/२/२३ चे १६.४० वा सुमारास घराच्य पाठीमागील गेट कोणीतरी वाजवीत असल्याचा आवाज असल्याने फिर्यादी व त्याची मुलगी असे गेट जवळ जावुन पाहिले असता दोन अनोळखी मुले गेटला लाथा मारत होते व एक मुलगा गेटला लटकुन आत मध्ये पाहत होता त्यावेळी फिर्यादीच्या मुलीने सदरचे गेट उघडले असता सदर मुले हे यापुर्वी पार्कीग केलेल्या कारमधील असल्याचे लक्षात आले.त्यातील एक मुलगा फिर्यादीचे अंगावर आला. तेव्हा पिर्यादीने तु घरामध्ये येवु नको असे म्हटले असता त्यातील एक फुल बाहयांचे पोपटी रंगाचे टि शर्ट व काळा पॅन्ट पायामध्ये पांढ-या रंगाचे शुज घातलेला अनोळखी मुलाने फिर्यादी व त्यांच्या मुलीला चिरडुन टाकेन , फाडुन टाकेन, खानदान खतम करुन टाकेन, तुम्हाला येथेच कापुन टाकेन, अशी धमकी दिली. व अश्लिल शिवीगाळ केली, तसेच इतर दुसरा अनोळखी मुलगा ज्याने गळद हिरव्या रंगाचे शर्ट काळा पॅन्ट पायामध्ये शुज घातलेला याने गेटवर जोरजोराने लाथा मारल्या. तसेच तिस-या मुलाने अंगामध्ये चेक्सचे पांढ-या व निळया रंगाची जिन्स पॅन्ट पांढरे शुज असलेल्या मुलाने सुध्दा गेटवर लाथा मारल्या परत त्या मुलांना पाहिले तर ओळखेल तिन्ही अनोळखी मुलांनी वय अंदाजे २१ ते ३० वर्ष यांनी फिर्यादीचे राहत असलेल्या घराजवळ येवुन फिर्यादी व त्यांच्या मुलीला गाडी पार्कीगच्या कारणावरुन गेटला लाथा मारुन अंगावर धावुन येवुन अश्लील शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन तिन्ही अनोळखी मुलाविरुध्द फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ अकस्मात मृत्यु

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा मर्ग क्र ०७/२०२३ कलम १७४ जाफौ | राहते घर कैलास नगर महादेवखोरी अमरावती<br><br>घ ता वेळ दि. ०२.०२.२०२३ चे २३.०० वा<br>दा. ता वेळ दि. ०३.०३. २०२३ चे १०.०४ वा | शाहुराव चैतुजी खडसे वय ५५ वर्ष रा. कैलास नगर महादेवखोरी अमरावती | सुमेध पांडुरंग खडसे वय ३४ वर्ष रा. शिवनगर अकोला | Brought Death | हकिकत अशा प्रकारे आहे यातील फिर्यादी यांनी आज रोजी पो स्टे ला येवुन जबानि रिर्पोट दिला कि, त्यांचे काका नामे शाहुराव चैतुजी खडसे वय ५५ वर्ष रा. कैलास नगर महादेवखोरी अमरावती हे पदविधर मतदारसंघाची दिवसभर डयुटी आटपुन रात्री घरी परत आले असता त्यांना उलटी आल्यासारखे वाटत असल्याने ते रुमच्या मागच्या बोळीत गेले असता ते अचानक चक्कर येवुन खाली पडले वरुन त्यांना उपचाराकरिता त्यांचा भाचा संजय यशवंत मोखडे रा उत्तम नगर याने इर्वीन दवाखाना येथे नेले असता तेथील डॉक्टर सा यांनी त्यांना चेक करून मृत घोषीत केले त्यांची तब्बेत ठिक नसल्याने व त्यांना उलटी व चक्कर येत असल्याने ते मरण पावले त्यांच्या मरणा बाबत कोणताही संशय नाही अशा फिर्यादीच्या जबानि रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल. |

## दिनांक ०४/०२/२०२३ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल प्रोव्हीशन) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | अपनं १०४/२०२३ कलम ६५ (अ) म.दा.का. | कैलास नगर नानवानी याचे घरासमोर चौरे मार्केट अमरावती | दि. ०३/०२/२०२३ चे १२/ ५०वा. ते १३.२० वा दरम्यान | दि ०३/०२/२०२३ चे १५/२५ वा. | सरतर्फे पोउपनी नरेशकुमार विजयकुमार मुंढे गुन्हे शाखा अमरावती शहर | रोशन संजय बघीले वय २० वर्ष रा. कवर नगर झोपडपटटी अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकानी यातिल आरोपी रोशन संजय बघीले वय २० वर्ष रा. कवर नगर झोपडपटटी अमरावती याचे वर फिर्यादी यांनी पो स्टाफ सह पंचासमक्ष प्रो रेड केली असता सदर आरोपीचे ताब्यातुन देशी दारू बॉबी संत्रा च्या ९० मिलीच्या १०० पावटया प्रत्येकी ४० रू प्रमाने ४०००/रु च्या व देशी दारू टॅंगो च्या च्या ९० मिलीच्या १०० पावटया प्रत्येकी ४० रू प्रमाने ४०००/रु च्या व ज्युपीटर मोपेड गाडी क्र एक एच २७ डी डी २९५९ कि अ ७००००/रु असा एकुन ७८०००/रु चा प्रोव्ही मुददेमाल जप्ती पंचनाम्याप्रमाने जप्त करण्यात आला नमुद आरोपी चे हे कृत्य कलम ६५ अ म.दा.का. प्रमाणे होत असल्याने त्याचेवर गुन्हा दाखल . |
| २. | नागपुरीगेट अमरावती | अपक्र ५५/२३ कलम ६५(ई) म.दा.का. | ग्राम सुकळी ता.जि अमरावती | दि. ०३/२/२०२३ चे १९/१० वा | दि. ०३/०२/२०२३ चे २०/४० वा | पोहेका संतोष यादव ब.न. १८८ पो.स्टे नागपुरीगेट अमरावती | प्रदिप देवरावजी मेश्राम वय ३४ रा. ग्राम सुकळी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो.स्टापसह पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमी दाराकडुन माहीती मिळाली की, एक इसम ग्राम सुकळी येथे मोकळ्या जागेत दारु विक्री करीत आहे अशा नमुद आरोपीवर पंचा समक्ष प्रो .रेड केली असता पोलीसांची चाहुल लागताच देशी दारु विक्री करणारा इसम माल सोडुन पळुन गेला तेथील असणारे लोकांना सदर इसमाबबत विचारपुस केली असता त्याचे नाव प्रदिप देवरावजी मेश्राम वय ३४ रा. ग्राम सुकळी अमरावती असे समजले तेथे असलेल्या नाँयलान च्या पिशवी पाहणी केली असता त्यामध्ये १५ नग देशी दारु बाँबी संत्रा च्या १८० मिली च्या सिलबंद पावट्या कि अं. १०५० रु चा माल मिळुन आला तो पंचा समक्ष जप्त केले नमुद आरोपी चे हे कृत्य कलम ६५(ई) प्रमाने होत असल्याने अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट सदर चा गुन्हा दाखल . |